# कायम विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळा परवानगीचे आदेश

**महाराष्ट्र शासन**

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१. यांचे कार्यालय
11 NOV 2003
आवक नोंदवही क्रमांक

क्रमांकः नमाशा १००३/(६९०/०३) /माशि-१
शालेय शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांकः १६ ऑक्टोंबर , २००३

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे/कोल्हापूर/नागपूर/ मुंबई नाशिक

विषयः- २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात
नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान
तत्वावर परवानगी देण्याबाबत.

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सोबत जोडलेल्या सहपत्रातील एकूण (१० ) शैक्षणिक संस्थांना, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशान्वये शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थांना माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबीची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.:-

(अ) या नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

(ब) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवळी निघणा-या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(क) शासनाच्या पूर्वपरवानगीचे निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

(ड) संस्थेच्या अध्यक्षाकडून कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन ते स्वतंत्रपणे जतन करुन ठेवावे.

(इ) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

(ई) " कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा " असा फलक अशा शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबधित संस्थेवर बंधनकारक राहील.

(फ) सदर कायम विना अनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिका-यांशी/ शासनाशी पत्रव्यवहार करतांना " कायम विनाअनुदानित शाळा " अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

(ग) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा.विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

ह) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा विद्यार्थ्यांच्या फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशायाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन,संबंधिल नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुबंई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थे मार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

३) " कायम विना अनुदान " तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. **विहित शर्तीची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.**

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

**( मा. आ. गुट्टे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत :माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित :-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
मा.शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
निवड नस्ती,

सहपत्र

शासन निर्णय :क्र मांक: नमाशा १००३/(६९०/०३) /माशि-१

दि.१६ ऑक्टोबर,२००३

२०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना

कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत

**जि. पुणे** (१८)

| अ. क्र | शाळेचे ठिकाण | ठिकाण संस्थेचे नांव | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | साडेसतरानळी, हडपसर, पुणे | महात्मा फुले विद्या निकेतन संस्था, ससाणीनगर, हडपसर, पुणे | मराठी | आठवी |
| २ | कोंढवा (बु.), साईनगर, पुणे | इंडियन एज्युकेशन सोसायटी, कोंढवा (बु.), साईनगर, पुणे | मराठी | आठवी |
| ३ | थेरगांव, पुणे | क्रांतीवीर चाफेकर शि. सं., चिंचवड, पुणे | मराठी | आठवी |
| ४ | भोसरी, पुणे | राष्ट्रप्रेम तरुण मंडळ, भोसरी, जि.पुणे | मराठी | आठवी |
| ५ | गिरवी, ता.इंदापूर, जि.पुणे | श्री भैरवनाथ ग्राम विकास प्रतिष्ठान, बावडा, ता.इंदापूर, जि.पुणे | मराठी | आठवी |
| ६ | बोराडे वस्ती, मोशी, ता.हवेली, जि.पुणे | श्री नर्मदेश्वर शि.प्र. मंडळ, मळेगांव, जि.सोलापूर | मराठी | आठवी |
| ७ | मुधाळणे, ता.जुन्नर, जि.पुणे | श्री गजानन महाराज शि. प्र. मंडळ, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे | मराठी | आठवी |
| ८ | मंदोशी, ता.खेड, जि.पुणे | परमपूज्य गगनगिरी महाराज एज्युकेशन सोसायटी, खारकुड, ता.हवेली, जि.पुणे | मराठी | आठवी |
| ९ | शिरोली, ता,खेड, जि.पुणे | शिरोली शि.प्र. मंडळ, शिरोली, ता.खेड, जि.पुणे | मराठी | आठवी |
| १० | औंढे, ता.मावळ, जि.पुणे | श्री एकविरा सेवा प्रतिष्ठान, देवघर, ता.मावळ, जि.पुणे | मराठी | आठवी |
| ११ | अंबडवेट, ता.मुळशी, जि.पुणे | आदर्श हिंदमाता शि. प्र. मंडळ, सुतारवाडी, अंबडवेट, ता.मुळशी, जि.पुणे | मराठी | आठवी |
| १२ | पुनावळे, ता.मुळशी, | प्रेरणा शि. सं., लक्ष्मणनगर, थेरगांव, पुणे | मराठी | आठवी |
| १३ | तळेगांव-ढमढेरे, ता.शिरुर, जि.पुणे | शिक्षण प्रसारक मंडळ, तळेगांव-ढमढेरे, ता.शिरुर, जि.पुणे | मराठी | आठवी |
| १४ | धानोरे - दरेकर वाडी, ता.शिरुर, जि.पुणे | श्री घनोबा शि.प्र. मंडळ, धानोरे - दरेकर वाडी, ता.शिरुर, जि.पुणे | मराठी | आठवी |
| १५ | सासवड, ता.पुरंदर, | श्री शिवाजी शि.प्र. मंडळ, सासवड, ता.पुरंदर, | मराठी | आठवी |
| १६ | रावेत, ता.हवेली, जि.पुणे | त्रिरत्न विद्या प्रसारक संघ, रावेत, ता.हवेली, जि.पुणे | मराठी | आठवी |
| १७ | लांडेवाडी-भोसरी,जि.पु | भारतीय ज्ञानवर्धिनी सभा, चिंचवड, पुणे | हिंदी | आठवी |
| १८ | राजीव गांधीनगर ,बिबवेवाडी , पुणे. | राष्ट्रीय समाजसेवा शिक्षण संस्था, अप्पर इंदिरनगर पुणे. | हिंदी | आठवी |

NIVEDEN ORDER GAIKWADE:1